**नगररचनाआणिमूल्यनिर्धारणविभाग**

शिपाई (गट-ड) पदासाठी

करावयाच्या अर्जासोबतचे **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** माहितीपत्रक

**(अ) अर्जकरण्याचीपद्धत**

कृपया सर्व सूचना वाचा आणि मगच अर्ज भरा.

**सूचना** :

शिपाई (गट-ड)पदभरती-२०२३चे अर्ज भरण्याबाबत सूचना

अर्जामध्ये खालील टप्पे आहेत :

- नोंदणी/नवीन खाते निर्माण करणे.
- अर्ज सादरीकरण.
- प्रोफाईल निर्मिती/ प्रोफाईल अद्ययावत करणे.
- छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करणे
- ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे.
- अर्जाची प्रिंटआऊट काढणे.

**(ब) अर्जदारांसाठी महत्त्वाच्यासूचना:-**

१. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असूनअर्ज करताना, शैक्षणिक प्रमाणपत्रे/ अन्य प्रमाणपत्रे संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक व बंधनकारक राहील. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक व बंधनकारक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चु का झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्या वर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राही ल. याबाबत उमेदवाराची कसल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही . ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही .त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी का ळजीपूर्वक भरावी.जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी , शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण , वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

२. ऑनलाईन अर्ज प्रक्रि येच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती , परीक्षेची रुपरेषा /वेळापत्रक/ परीक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इ .बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध राहिल . याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही . उमेदवाराला परीक्षा तसेच कागदपत्रे पडताळणीसाठी सर्व संबंधित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल . सदरहु ऑनलाईनपरीक्षेचे (Computer Based Test) आयोजन महाराष्ट्र राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, कोंकण विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये केले जाईल.वाटप करण्यात आलेल्या परीक्षाकेंद्रात कोणत्याही परिस्थितीत बदल होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी .

३. परीक्षा शुल्क –

| पदनाम | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| शिपाई(गट-ड) | १०००/- | ९००/- |

**माजी सैनिकांसाठी परीक्षाशुल्क आकारले जाणार नाही.**

**उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील . परिक्षा शुल्क ना-परतावा ( Non refundable) आहे.**

४. उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरी , त्यांनी या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक व बंधनकारकआहे.

५. शासनाच्यासामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२ मधील तरतूदींनुसार मुलाखत घेण्यात येणार नसल्या ने उमेदवाराची अंतिम निवड ही ऑनलाईन (लेखी )परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल . मात्र, उमेदवाराची ऑनलाईनपरीक्षा ही त्यांनी अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रांची पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत . कागदपत्रांच्या पूर्ण पडताळणीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल . सदर प्रक्रीयेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळण्यात येईल . पात्रता धारण न क रणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

६. ऑनलाईन परीक्षा एकूण २०० गुणांची (प्रत्येकी २ गुणांचा एक प्रश्न याप्रमाणे १०० प्रश्न) घेतली जाईल. त्यापैकी मराठी + इंग्रजी + सामान्यज्ञान + बौद्धिक चाचणी यासाठी प्रत्येक विषयास ५० गुण याप्रमाणे २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल . सदर ऑनलाईनपरीक्षा ही शिपाई पदासाठी निश्चित केलेल्या किमान शैक्षणिक अर्ह तेशी संबंधित अभ्यासक्रमावर आधारित व २ तासांची असेल . प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल . बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. सदर परीक्षेसाठी नकारात्मक गुणपध्दत अवलंबली जाणार नाही.

७. पात्रतेकरिता सर्व संवर्गातील उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

८. ऑनलाईन (लेखी ) परीक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांचा अं तिम निकाल महाराष्ट्र शासनाच्या**www.urban.maharashtra.gov.in** तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या **www.dtp.maharashtra.gov.in**या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

**९. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असून अर्ज करताना उमेदवारानेसर्व विभागाचा अनुक्रमे प्राधान्यक्रम , निवड करणे बंधनकारक राहील . आणि पात्र उमेदवारां चा अंतिम निकाल हा उमेदवारांच्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार आणि अर्जात नोंदविलेल्या प्राधान्यक्रमानुसार जाहीर करण्यात येईल.**

१०.शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले असून यामध्ये वेळोवेळी झा लेल्या सुधारणा नुसार कार्यवाही करणेत येईल . महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास पुरुष उमेदवारांचा विचार केला जाईल.

११. महाराष्ट्र राज्य लोकसेवा [अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यां च्यासाठी आरक्षण] अधिनियम, २००१ नुसार प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा (अ), भ.ज (ब), भ.ज (क), भ.ज (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासव र्ग यांना लागू आहे . या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका -याचे **दि.३१/०३/२०२४** पर्यंत वैध असलेले मूळ प्रमाणपत्र तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक व बंधनकारक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१२. ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे , अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्रा ची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवा राने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची निवड जात वैधता प्रमाणपत्राअभावी रद्द करण्यात येईल.

१३. खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण , शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागा कडील शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै, २०१६, शासन शुद्धीपत्रक दि.१० ऑक्टोबर, २०१७ व शासन शुद्धीपत्रक दि .११ मार्च, २०१९मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसा र राहील. त्यांचेकरीता उच्च वयोमर्यादा कमाल ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील . प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा -या उमदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका -याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे .तसेच शासन शुध्दीपत्रक दि . २४ ऑक्टोबर, २०१९ मधील तरतुदीनुसार परीक्षेसाठी सादर करावयाच्या अर्जाच्या अंतिम दिनांकाआधी , तो ज्या विभागात वास्तव्यास आहे त्या विभागातील संबंधित उपसंचालक , क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर के लेला असणे बंधनकारक आहे . तसेच खेळाडूने कोणत्या विभागातील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे हे आवेदन अर्जात नमूद करणे तसेच त्याची पोच पावती सोबत जोडणे बंधनकारक आहे .उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून आधीच प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील . तसेच कागदपत्रे पडताळणीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रिडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधणकारक राहील. अन्यथा सदर उमेदवार खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही.

१४. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) असलेले आरक्षण शासनाच्या सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील . सदरहु आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले दि.३१.०३.२०२३ पर्यंत वैद्य असणारे पात्रता प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१५. परिक्षेचा निकाल तयार करतांना, परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२मधील तरतूदींनुसार निश्चित करण्यात येईल . आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

१६.दिव्यांग व्यक्तींकरिता आरक्षित पदावरील नियुक्तीसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय तज्ञाने दिलेले प्र माणपत्र सादर करणे आवश्यक व बंधनकारक आहे. दिव्यांग व्य क्तीसाठी अ सलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर को णताही प्रकार फाय दा घेऊ इ च्छीना-या उमेदवाराने शास न निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग क्र .अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीव्दारे वित रित कर ण्यांत आलेले नवीन नमु न्यातील दिव्यां गत्वाचे प्रमा णपत्र सादर करणे बंधनकारक आहे . दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत, शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-५०२१/१०१/प्र.क्र. ३९/नवि-२७, दिनांक ०२ मार्च, २०२१ मधील तरतूदींनुसार,शिपाई या पदाची जबाबदारी व कर्तव्य पार पाडणाराउमेदवार योग्य त्या सॉफ्टवेअर, साधने आणि उपकरणे यांच्या सहाय्यासह नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

१७. (अ) शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्र.दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दि.०५ ऑक्टोबर, २०२१ मधील तरतूदींनुसार, अंधत्व व मेंदूचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी मागणी केल्यास शासन नियमानुसार लेखनिकाची सुविधा उपलब्ध राहील. संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/ कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये या कार्यालयाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे . अशी पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

१८.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र . एईएम-१०८०/३५/१६-अ दि.२० जानेवारी, १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रंस्तासाठी आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणा-या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपा सणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

१९.गुणवत्ता यादीमध्ये येणा -या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपा सणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

२०.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र . पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दि.२७.१०.२००९ व क्र . अशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ दि . १९.९.२०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील . निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा -यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मूळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२१.निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या वित्त विभागा कडील शासन निर्णय दि .७ जुलै, २००७ मधील नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

२२.उमेदवार हा भारताचा नागरीक असावा तसेच तो महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा व त्याबाबतचे प्रमाणपत्र त्याच्याकडे असणे आवश्यक व बंधनकारकराहील. तसेच त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२३. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांबाबत उमेदवारांस काही हरकत असल्यास प्रति प्रश्न रु . १००/- इतके शुल्क आकारले जाईल. तसेच परिक्षेच्या समाप्ती दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत प्राप्त असलेल्या हरकती विचारात घेण्यांत येतील.

२४. **वेगवेगळया सत्रांमध्ये पार पडणाऱ्या परीक्षेमधील प्रश्नपत्रिका वेगवेगळया असतील. अशा वेळी परीक्षार्थीची संख्या विचारात घेऊन परीक्षा एकापेक्षा अनेक सत्रांत पार पाडावयाची झाल्यास भिन्न प्रश्नपत्रिकांच्या काठिण्य पातळी चे समानीकरण** (Normalization) **करण्यात येईल व त्यासाठी टिसीएस कंपनीकडून देण्यात आलेल्या सूत्रानुसार** Normalization **या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल**.

२५. निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी वेळी, पडताळणी समितीकडे खालील मूळ प्रमाणपत्रांसह त्याच्या साक्षांकित छायाप्रती दोन प्रतीत सादर करणे आवश्यक व बंधनकारक राहील :-

i) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र -शासनमान्य संस्थेने निर्गमित केलेले प्रमाणपत्र व गुणपत्रिका

ii) अधिवास प्रमाण पत्र - महाराष्ट्र राज्यात वास्तव्य असल्याबाबतचे महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र

iii) जन्मतारखेबाबत - जन्म नोंदीचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र / एस.एस.सी. गुणपत्रिका व प्रमाणपत्र

iv) जात प्रमाणपत्र - राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र

v) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) - जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र

vi) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र - असे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल अशा प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सध्या वैध असलेले सक्षम प्राधिकारी यांचे कडील दि.३१.०३.२०२४ पर्यंत वैद्य असणारे प्रमाणपत्र.

vii) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र - नमुना-अ मध्ये इंग्रजी / मराठी मध्ये सादर करणे.

viii) खेळाडूबाबतचे प्रमाणपत्र - योग्य त्या क्रीडाप्राधिकरणाने / सक्षम प्राधिकारी यांचेकडील पडताळणी करुन निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र.

ix) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्याबाबतचे पत्र - संबंधित जिल्हास्तरीय समितीने निर्गमित केलेले पत्र.

x) दिव्यांगाचे प्रमाणपत्र – संबंधित जिल्हा शल्य चिकित्सकाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

xi) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र – संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले दि३१.०३.२०२४ पर्यंत वैद्य असणारे प्रमाणपत्र.

xii) माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/पदवीधर अंशकालीन कर्मचारी – संबंधीत सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र.

यात्यतिरिक्त वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन आदेशानुसार अन्य प्रमाणपत्रांची आवश्यकता भासल्यास ती पुरविण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारावर राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२६. विहित वयोमर्यादेतील शासकीय , निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या मान्यतेने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरणे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक व बंधनकारकआहे. याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावीत.

२७. उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या निवडी संबंधात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल . तसेच नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या अर्हताविषयक

अटी पूर्ण न करणाऱ्या अथवा कोणत्याही प्रकारे गैरवर्तणूक /गैरप्रकाराचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारा स कोणत्याही टप्प्यावर निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल आणि /किंवा सदर उमेदवार इतर योग्य अशा कारवाईस पात्र असेल.

२८.**अर्जामध्ये नमूद केलेली माहिती अंतिम राहील . त्यावर परत केलेला पत्रव्यवहार विचारात घेण्यात येणार नाही**.

**(क) इतर सर्वसाधारणसूचनाः-**

१) परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संके तस्थळावर परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे १० दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल . त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२) शिपाई (गट-ड)या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रातील कोकण/ नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर विभागात मेरीट लिस्ट तसेच त्यांनी दिलेल्या प्राधान्यक्रम विचारात घेवून नियुक्ती देण्यात येईल.

३) अर्ज केल्यानंतर पुढील निवड प्रक्रियेला विशिष्ट कालावधी लागणार असल्या मुळे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्याबाबत नगर रचना संचालनालयाकडे अथवा त्यांचे अधिनस्त कार्यालयांकडे कुठलीही चौकशी (मौखिक अथवा लेखी) किंवा दूरध्वनीद्वारे करु नये.

४) वरील पदांवर शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्यात विभागीय कार्यालयाच्याअधिनस्त कार्यालयात कोठेही नियुक्ती/ बदली होऊ शकेल.

५) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे उमेदवारास परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे , असे समजता येणार नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे आढळल्यास , खोटी कागदपत्रे दिल्याचे आढळल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्दबादल होईल.

६) निवड प्रक्रीयेसंदर्भात शासन / न्यायालयाचे निर्णय सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहातील . कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव भरती / निवड प्रक्रीया स्थगित / रद्द करण्याचे अधिकार शासनाच्या नगर विकास विभाग/संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे / निवड समितीने राखून ठेवले आहेत.

--------x---------